मच्छिमार सहकारी संस्थांच्या सभासदांच्या
यांत्रिकी नौकांना लागणाऱ्या हायस्पीड
डिझेल तेलावरील मूल्यवर्धीत कराची
(VAT) प्रतिपूर्ती करणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-मत्स्यवि-१००५/प्र.क्र.१७४/पदुम १४**
**मंत्रालय विस्तार,मुंबई-४०००३२.**
**दिनांकः-३१ मार्च,२००८.**

**वाचाः-**

१) शासकीय अधिसूचना, वित्त विभाग,क्र.एमएसटी-१२९५/सीआर-१०५/ टॅक्सेशन-३,दि.२२.११.१९९६.

२) कृषि व पदुम विभाग,क्रमांक-मत्स्यवि-४६२५/(१३७)/पदुम-१४,दि.१४ जानेवारी, १९९७ चे अर्धशासकीय पत्र.

३) शासन निर्णय,कृषि व पदुम विभाग,क्रमांक-मत्स्यवि-१०९४/प्र.क्र.४९/पदुम-१४, दि.२७ जानेवारी,१९९१.

४) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम,२००२-महाराष्ट्र सुधारणा विधेयक .क्र.१/२००५,दि ९ मार्च,२००५.

५) शासन निर्णय,कृषि व पदुम विभाग,क्रमांक-मत्स्यवि-१००५/०५२५०२/१६३/२००७, दि.२९/८/२००७ चे पत्र.

**प्रस्तावना**:-

उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील वित्त विभागाची शासकीय अधिसूचना दि.२२.११.१९९६ अन्वये महाराष्ट्रातील मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना त्यांच्या यांत्रिक नौकेसाठी (१-६ सिलेंडर) लागणाऱ्या हायसपीड डिझेलवर १०० टक्के विक्रीकरी सवलतीची योजना वित्त विभागामार्फत राबविण्यात येत होती. राज्यातील मच्छिमार सहकारी संस्थांना त्यांच्या सभासदांना यांत्रिक नौकांसाठी उपरोक्त संदर्भाधिन २ येथील अर्धशासकीय पत्रान्वये ठरविण्यात आलेल्या निकषाप्रमाणे आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचेमार्फत शासन निर्णय दि.३.९.२००५ अन्वये राज्यातील मच्छिमार सहकारी संस्थांच्या यांत्रिक नौकांना (१ ते ६ सिलेंडर) लागणाऱ्या हायस्पीड डिझेलवर १०० टक्के विक्रीकरात सवलत देण्याची योजना पुढे चालू ठेवण्यात आली आहे. सदर शासन

निर्णयान्वये डिझेलवरील मूल्यावर्धीत कराची प्रतिपूर्ती करण्याचे प्रस्ताव मंजूर करण्याचे अधिकार आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांना देण्यात आले आहेत. मच्छिमार सहकारी संस्थांना डिझेलवरील मूल्यवर्धीत कराची प्रतिपूर्ती करण्यास विलंब होत असल्यामुळे त्यांचेमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. ही बाब लक्षांत घेऊन सदर अधिकारात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.याबाबत संदर्भाधिन अनुक्रमांक ५ मधील शासन निर्णय दि.३.९.२००५ मध्ये सुधारणा करुन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेः-

**शासन निर्णय**ः-

राज्यातील मच्छिमार सहकारी संस्थाच्या यांत्रिक नौकाधारकांनी (१ ते ६ सिलेंडर) खरेदी केलेल्या हायस्पीड डिझेलवर १०० टक्के मूल्यवर्धीत कराची प्रतिपूर्ती करण्याची योजना पुढे चालू ठेवण्यात येत आहे. ही योजना पूर्वीप्रमाणेच सागरी जिल्हयात मुंबई,ठाणे,रायगड,रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयांत कार्यतर राहील. मच्छिमार सहकारी संस्थांनी यांत्रिकी नौकांना लागणारे हायस्पीड डिझेल प्रथम मूल्यवर्धीत करासहीत प्रचलित दराने खरेदी करावे व १०० टक्के डिझेलवरील मूल्यवर्धीत कराची बिले/प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रासह संबंधित जिल्हयाच्या सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांचेकडे प्रतिपूर्तीसाठी सादर करावी. व त्यानंतर संबंधित सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांनी प्रतिपूर्तीसाठी बिले/प्रस्तावाची छाननी करुन संबंधित संस्थांना १०० मूल्यवर्धीत कराची प्रतिपूर्ती रुपाने पात्र मच्छिमार सहकारी संस्थांना रक्कम अदा करावी. मच्छिमार संस्थांना यांत्रिकी नौकांना लागणाऱ्या हायस्पीड डिझेलवरील मूल्यवर्धीत कर (VAT)प्रतिपूर्तीचे संपूर्ण अधिकार सबंधीत सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांना प्रदान करण्यात येत आहेः-

२. सदर योजना योजनेत्तर योजना म्हणून राबविण्यात येईल व सदर योजना योग्य रितीने व सुरळीतपणे राबविण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यप्रणाली असेलः-

अ) संबंधित जिल्याचे सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक हे आहरण व संवितरण अधिकारी राहतील.

ब) आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी या योजनेसाठी अर्थसंकल्पित तरतूद आवश्यकतेनुसार संबंधित जिल्हयांसाठी विभागून देण्याची कार्यवाही करावी व हा खर्च मासिक कॅश-फ्लोप्रमाणे होईल, याची दक्षता घ्यावी.

क) सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांना पीएलअे खाते उघडण्यास परवानगी देण्यात येत आहे. तसेच सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांना या योजनेसाठी लागणारी रक्कम लेखा व कोषागारातून काढण्याची व त्यांच्या बँकेतील स्वीय प्रपंजी खात्यात जमा करण्याची अनुमती देण्यात येत आहे.

ड) सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावर संबंधित सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक हे अंमलबजावणी अधिकारी आणि प्रोदशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक, मुंबई हे पर्यवेक्षकीय अधिकारी असतील.

ई) शासनमान्य संबंधित डिझेल कंपनीला आयुक्त मत्स्यव्यवसाय हे डिझेल वाटपाबाबत प्राधिकृत करतील. शासन अ.शा.पत्र दिनांक १४.१.१९९७ मधील निकषानुसार आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचेमार्फत डिझेल कोटा ठरविण्यात येईल.

३. राज्यातील मच्छिमार सहकारी संस्थेच्या सभासद मच्छिमारांच्या यांत्रिकी (१ ते ६ सिलेंडर) लागणाऱ्या हायस्पीड डिझेलवरील मुल्यवर्धीत कराची प्रतिपूर्ती करण्यासाठी डिझेलची देयके मुल्यवर्धीत कर परताव्यासाठी अनुज्ञेय ठरविण्यांत आली आहेत. सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांनी त्यानुसार कार्यवाही करावी.

४. आयुक्त मत्स्यव्यवसाय, हे या योजनेचे नियंत्रण अधिकारी राहतील, त्यांनी या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होईल याबाबत दक्षता घ्यावी.

५. संबंधित सहाय्यक मत्स्यव्यवसाय संचालक यांनी प्रत्यक्ष मासिक खर्च केल्याची एकत्रित माहिती त्या महिन्यानंतरच्या १० तारखेपर्यंत प्रादेशिक मत्स्यव्यवसाय संचालक, मुंबई व आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचेकडे पाठवावी. सर्व जिल्याची माहिती एकत्रित करुन आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाने दर महिन्याला २५ तारखेपर्यंत शासनास सादर करावी.

सदर योजनेसाठी होणारा खर्च खालील लेखाशिर्षातून भागविण्यात यावाः-

मागणी क्रमांक डी-७
२४०५-मत्स्यव्यवसाय
१०३-सागरी मत्स्यव्यवसाय
(०१) (०३)-हायस्पीड डिझेल तेलावरील विक्रीकराच्या
प्रतिपूर्तीसाठी अर्थसहाय्य
३३-अर्थसहाय्य (२४०५ १२७ ८)

७. हे आदेश दिनांक १ एप्रिल २००८ पासून अंमलात येतील.

८. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४/व्यय-१,दि.२४.१.२००८ अन्वये व त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

९. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावरुन प्रसारित करण्यात आला असून त्याचा संकेतांक २००८०३३११३४९४१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(म.ह.सोनकुसरे),
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

प्रति,

आयुक्त,मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक,मुंबई

संचालक,अर्थ व सांख्यिकी संचालनालय,मुंबई

सहसंचालक,लेखा व कोषागारे,संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला,मुंबई (५ प्रती)

लेखा अधिकारी,आयुक्त मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय,मुंबई

महालेखापाल,महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता),मुंबई

अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई

निवासी लेखा अधिकारी,मुंबई

जिल्हा कोषागार अधिकारी,ठाणे/रायगड(अलिबाग)/रत्नागिरी/सिंधुदुर्ग

मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई

मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई

वित्त विभाग (व्यय-१)/(अर्थसंकल्प-३)/(अर्थसंकल्प-१४),मंत्रालय,मुंबई

कार्यासन अधिकारी,पदुम-१२,पदुम-१४,पदुम-१६,कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई

निवडनस्ती